# - अमृत कलश -

पद्मश्री पं. सुमतिबाई शहा

श्राविका प्रकाशन, सोलापूर.

प्रकाशक व मुद्रक -
विद्युल्लता शहा,
श्राविका प्रकाशन
क्षु. रा. दि. जैन श्राविकाश्रम सोलापूर

मूद्रण स्थळ-
श्राविका मुद्रणालय,
पं. सुमतिबाई शहा पथ, श्राविका चौक,
बुधवार पेठ, सोलापूर.

मूल्य-
परमार्थाने-स्वाध्याय / मनन / चिंतन
लौकिक-यथाशक्ती - ज्ञानदान

# अमृत - कलशाच्या निमित्ताने -

आचार्य कुंदकुंदाचे सुप्रसिध्द टीकाकार, परम दार्शनिक, अध्यात्ममूर्ती श्रीमद् श्री अमृतचंद्र आचार्यानी आपल्या अनुभूतीने समयसार, प्रवचनासार नियमसार इ. अनमोल ग्रंथरत्नांचे सारच जणु आपल्या टीकेत ओतले आहे. त्यांची ती अनुभूती हृदयाच्या अंतःस्थलाला स्पर्श करणारी आहे. अध्यात्माचे नवनीत वाचकांना सादर करताना त्यांनी हातचे काही राखून ठेवले नाही. जैन अध्यात्मविद्येचे परमश्रेष्ठ ज्ञाते व रसिक असलेले अमृतचंद्र आपल्या अमृतवाणीने रसिकांना समयसाराचे अमृत-तत्वच स्पष्ट करते झाले आहेत.

जवळ जवळ एक हजार वर्षानी अध्यात्माची गंगा त्यांनी जनमानसाच्या चित्तशुध्दीसाठी व त्यांना कैवलयबोधाचे ज्ञान व्हावे यासाठी सुंदर संस्कृत भाषेत आणली आहे. त्या समयसार रुप गंगेचे परम पवित्र कल्लोकांनी हृदय करसें शांत व गंभीर बनते, याचा अनुभव वाचकांना त्यांनी लिहिलेल्या टीकेतून पदोपदी दिसू शकतें. जीवनानुभवाचा विशुध्दतर अनुभव घेऊन जे त्यांनी शब्दबध्द केले आहे. ते तर अत्यंत हृदयस्पर्शी व आंनददायी आहे. अध्यात्मरस हा जणु सर्व रसांचा राजा आहे, अशी त्यांची मनोमन धारणा आहे. त्या रससिक्त चिंतनधारेत परमत्तत्व जे आत्म-तत्व, त्यांनी कथित केले आहे, त्याला भारतीय अध्यात्मशास्त्रात तोड असणे शक्य नाही. जीवन जगताना आपण जे जीवन म्हणून जाणतो, भोगतो ते जीवन नसून त्या जीवनात क्रोधादि कषायांचे, हास्य-रति-अरिति आदि विकारांचे विविध वासनांचे, अ-सम्यक्‌रुप विविध भावभावनांचे जे मलिन प्रवाह मिश्रित झाले आहेत, ते जीवन आपण भोगत आहोत. गढूळ पाणी पीतांना अविवेकी माणूस तसेच गढूळ पाणी पितो, पण विवेकी, सूज्ञ जाणकार माणस ते पाणी शुध्द, निर्जंतुक करुन, निर्मळ स्वरुपात त्याचे रुपांतर करुन पितो. हा विवेकी आणि अविवेकी यातील फरक आहे. तसेच प्राप्त जीवन मुळात शुध्द, स्वच्छ, निर्मळ असले तर ते विविध भाव-कुभावांच्या मलिनतेमुळे मलिन, अ-स्वच्छ झाले आहे, याचा बोध त्यांनी करुन दिला आहे.

आत्म-तत्वाचे इतके सहज-स्पष्ट विवेचन व तेही इतके हृद्य-स्वरुपात कुणी केले नव्हते. आचार्यांनी आपल्या विज्ञानधन ज्ञानस्वरुपाने आत्म्याची इतकी हृद्य ओळख करुन दिली आहे की त्याला तोड नाही. परमार्थात मुळात जो आत्मा, स्वयं परमात्मस्वरुपात प्रत्येक जीवनमात्रात सदैव, अक्षुण्ण, अखंड, त्रैकालिक स्वरुपांत विद्यमान आहे, अनंत गुणांनी परिपूर्ण आहे, त्याकडे

केवळ दृष्टिक्षेप करावा, त्याचे स्वरुप स्पष्टपणे, नि:शंकपणे, र्निभयपणे जाणून घ्यावे, यासाठी त्यांनी टीकेचा सुंदर प्रपंच मांडला आहे.

आचार्याच्या त्या संस्कृत-टीकेचा भाव माझ्या ह्रदयात प्रतिबिबित झाला आहे, व ज्यामुळे माझ्याही जीवनात क्रांती घडून आली आहे, तो त्यांचा शुभभाव मनी धरुन मी आपल्या परीने माझ याही बांधवांना मुक्त-मराठीत कथन करावा, या हेतूने हे चिंतन कले आहे.

आत्म्याची गीते अनेक ऋषी - मुनींनी, दार्शनिकांनी व साधु-संतांनी गायली आहेत. ती सारी मंडळी त्या एकाच भुक्ति-यात्रेचे प्रवासी आहेत. त्या चिद्-आनंद स्वरुप आत्म्याचे गीत, मीही आचार्यांच्या मार्गदर्शनाचा मागोवा घेत, या ग्रंथांतून गाइले आहे. अनुभूतीचा ओलावा, त्यातून यावा, प्रत्येक वाचकाला अपल्या आत्म-स्वभावाचे स्पष्टपणे स्वरुप कळावे व तयाने कसल्याही परतत्वासंबंधीचा मोह, लोभ, द्वेष बाळगू नये, यासाठी त्यांनी अत्यंत स्पष्टपणे, सुललितपणे मांडणी केली आहे. प्रत्येक जीवाची जी सांसारिक अवस्था आहे, ती त्याने स्वत:च आत्मलक्षी व आत्मस्पर्शी भावना न बाळगल्याने आहे. हे त्यांनी जाणवून दिले आहे, प्राणिमात्राचा सारा पुरुषार्थ हा आत्मस्वरुपाची ओळख करुन घेऊन त्या आत्म-स्वरुपाश्ी सन्मुख होण्यातच आहे. इतर पराश्रयी व परावलंबी पुरुषार्थ हा पुरुषार्थ नसून ती आत्मवंचना आहे. याच जन्मात प्रत्येक सुज्ञ मानव, जाति-धर्म-वंश निरपेक्षपणे आत्मस्वरुपाला जाणून घेऊन व त्याचाच आश्रय करुन, सर्व पर-पदार्थाचा मोह-त्याग करु श्कतो. जी शांती, जे सौख्य, जी अनुकुलता त्या आत्मस्वरुपाच्या बोधाने होते, ती अन्य वैभवाने, सत्तेने, संपत्तीने होणे कदापि श्क्य नाही, अशी आंतरिक जाण निर्माण करण्याचे सामर्थ्य आचार्यांच्या रसपूर्ण् टीकेत आहे. त्या टीकेतून मनाला सतत जाणवणारी स्व-सत्ता-बोधामृताची पखरण तर अवर्णनीय आहे. जीवनाचा परसापेक्षततेचा, पराश्रयाचा जो शाप मिळाला आहे त्यामुळे मानव सतत आपल्या स्वभावाला पारखा रहात आला व त्यामुळे आत्मावलबनाचा मार्ग विसरुन सर्वत्र पसरुन राहिलेल्या ज्ञेयगम्य पदार्थांतच रस घेत राहिला. ही त्याची परावलंबी, हीन-दीन अवस्था पाहून परम कारुण्यमुर्ती आचार्यांनी त्याला एक सुखमय, शांततामय, निरामय असा मार्ग दाखविला आहे. जीवनातील सारे सौख्य, सारा आनंद, सारा प्रकाश अंतरीतच सामावला असून मानव अज्ञानाने, आळसाने त्याकडे दृष्टिपात करीत नाही, याचा आचार्यांना मनी खेद वाटतो. म्हणून करुणबुध्दीने मानवाला खरी जाग आणून देण्यासाठी त्यांनी जाज्वल्य स्वरुपाचे अध्यात्माचे तत्वज्ञान तर्क, अनुमान, आगम यांच्या सहाय्याने

स्पष्ट केले आहे. त्या टीकेतील त्यांचे बुध्दि-वैभव तर अत्यंत चमत्कृतिपूर्ण आहेच, परंतु त्याहीपेक्षा अनुकंपारसात निमग्न अशा त्यांच्या वाणीने मानवाला सतत एक प्रकारची अननुभूत तहान भागविण्याचे प्रेमपूर्ण आवाहन केले आहे.

सर्व विश्वाचे नित्य-अनित्यात्मक, भावअभावात्मक, अस्ति-नास्तिस्वरुपाचे दर्शन घडवीत असता, लक्ष-भूत व अभिप्रेत असे जे आत्म-तत्व त्याचे भान त्यांनी सतत राखले आहे. नित्य व सहजमय रीतीने परम-शुध्द आत्मतत्वाचे गीत गाताना ते इतके तल्लीन होतात की जणु खरा आत्माच ते वाचकापुढे सादर करतात. त्यातही त्यांनी आत्म्यात जे अनंतानंत चमत्कृतिपूर्ण परमसामर्थ्य आहे, जे समुच्चय आहे, त्या गुणांचा एक एक पदर मोकळा करुन त्या एकएका सूक्ष्मतम अवस्थातून असलेले एका क्षणाचेही सामर्थ्य कैवल्याचे दर्शन घडवू शकते, असा नवा, अस्सल आशावाद त्यांनी समर्थपणे मांडला आहे.

अनेक दिवसांपासून त्या वंदनीय आचार्यांच्या कृतीवरुन मराठी जणांना सुलभ महाराष्ट्री भाषेत त्यांच्या भावगर्भ टीकेचा परिचय करुन द्यावा असे वाटत होते. भ. कुंदकुंद देवांच्या दोन हजाराव्या या वर्षात त्यांनी सर्व मानवतेच्या कल्याणासाठी समर्पित केलेल्या समयसाराचा रस-कलश माझ्या प्रिय वाचकांना द्यावा, ही अतरंगीवी मनीषा होती. त्यामुळे मी आजवर जी वाटचाल करीत आले, ती केवळ आचार्यांच्या त्या ग्रंथाच्या प्रकाशातच. तो प्रकाशच मला माझ्या जीवनाच्या वाटचालीत उपयोगी पडला आहे. निरासक्तपणे आनंदमय जीवन कसे जगावे याचा वस्तुपाठच मला त्यांच्याकडून मिळाला आहे माझे भाव-विश्व अंतरंगातून फुलून यायला समयसार उपयोगी पडला आहे. त्या समयसारांचे काही तुषार शब्द-बध्द करण्याचा हा प्रयत्न आहे.

आचार्य श्री अमृतचंद्र यांनी जो अनुभव घेतला व त्या आत्मानुभवात रमत असता जो आनंद व जे सौख्य त्यांनी प्रत्यक्ष अनुभवले त्यातूनच समयसारावरची त्यांची टीका रचली गेली आहे. त्यांचाच खरा तर असा अधिकार आहे. अधिकारविण काही सांगणे म्हणजे दूरच्या चंद्राला कवेत घेण्यासारखे. जीवनात भोग, उपभोग, लोभ-क्रोध, अहंकार इ. विषय अशा लाटा उठत असतात. विकार वासनांच्यामुळे जीवनात अमंगलत्व येते. त्याबाबतही आचार्यानी कुंदकुंद देवांच्या समयसारातील दृष्टीकोण स्पष्ट केला आहे, आत्म्याच्या ज्ञान-दर्शन-चारित्र्यात्मक एकतेहून जो जो विचार भिन्न आहे, वेंगळा आहे तो तो आत्म्याचा नाही, असा स्पष्ट निर्वाळा आचार्यांनी दिला आहे, चैतन्याला जे जे प्रतिकूल, विषय व अनाभिप्रेय आहे ते ते आत्म्याचे

नव्हेच. जे जे परिवर्तन, बदल जीवात घडून येते ते त्याच्यामुळेच, म्हणून व्यवहारात इतर अनेक कारणामुळे कार्य घडते असे संगितले तरी, प्रत्येक जीवमात्राचे परिवर्तन त्याच्या त्याच्या स्व-शक्तीनेच घडते, असे समजले पाहिजे. ही जी स्वतंत्रता आहे. ती स्वनिष्ठच आहे. त्या अर्थाने जीव स्वतःच कर्ता स्वतःच कर्ता स्वतःच कर्म आहे. स्वतःच करण आहे. प्रत्येक क्षणात जी अवस्था आहे, ती देखील स्वयंभू आहे. इतकेच नव्हे तर जीवात जे अनंतानंत गुण आहेत त्या गुणांची जी क्षणवर्ती अवस्था आहे, ती देखील स्वतंत्र आहे. व्यवहारात किंवा कथन करतांना जो संयोग- संबंध, संश्लेश्-संबंध्, किंवा आधार-आधेय संबंध सांगण्यात येतो तो तेवढ्या पुरताच खरा आहे. तो परमार्थ ही खरा नाही असे स्पष्टपणें जाणले पाहिजे.

आजच्या संसारी अवस्थेत आत्मा कर्मबध्द असला, व त्या कर्मांची सुख-दुःखात्मक फळे भोगत असला, तरीही परमार्थाने तो कर्माचे काही देणे घेणे लागत नाही. कर्मामुळे संसारी आहे. सुखी-दुःखी आहे, हा विचार पराश्रित असलयाने तो पराश्रितपणा देखील जाणला, अनुभवला पाहिजे ही विश्लेषणात्मक दृष्टी निर्माण झाली तरच आत्मा व इतर पर पदार्थ यांचा लक्षणभूत संबंध नाही, असे ध्यानी येते. याला आचार्य भेद विज्ञान म्हणतात त्यामुळे पराश्रित विचारांचा बा स्वाघित विचारांचा भिन्नपणा, सतत जाणवत राहाल्याने जो पुरुषार्थ जागा हातो, तो महत्वाचा आहे त्या पुरुषार्थ तेजामुळे पराश्रित बुध्दीचा नाश होतो व आत्मरतीचा दिव्य आनंदही प्रगट होतो.

आचार्यांनी साधकाला आगमातील विविध-स्वरुपाच्या मांडणीचाही उपयोग करुन घेतला असून आगमातील मांडणी व अध्यात्मशास्त्रातील मांडणी भिन्ननसून दृष्टिकोण फक्त वेगळा वेगळा कसा आहे, याचे मार्मिक प्रतिपादन केले आहे. तर्क, अनुमान, आगम व व्यवहार यांचा सुंदर मेळ घातला आहे.

तसेच समयसारातील वेगवेगळे मुद्दे घेऊन आज जी आग्रही भूमिका लोक स्वीकारत आहेत त्याचाही निषेध आचार्यांनी सम्यक्पणे केला आहे शक्ती व सामर्थ्य असतांना, आत्म्यातील तया सामर्थ्याला, पुरुषार्थाला टाळून व्रते, दीक्षा, पांच महाव्रतांचे, अणुव्रतांच पालन, दान, तप इ. महत्वाच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करीत आहेत, व केवळ समयसाराच्या स्वाध्यायाचा हट्टात करीत, आहे, ग्रह, तो देखील विचार कसा कुंदकुंद देवांना अभिप्रेत नाही. याचे देखील सुंदर वर्णन आचार्यांनी केले आहे. जिनाय निरागाय नमोनेकान्त शालिने अशा वंदनात कर्मांना जिंकण्याचा,

राग-द्वेषाना जिंकण्याचा अभिप्राय आहेच. त्या संदर्भातच आजचे संसारी जीवन व त्यातून मुतिक्तार्गांचा अवलंबन यांचे स्पष्टीकरण त्यांनी केले. आजच जीवात्मा शुध्दबुध्द-केवली मानला तर मग नवा पुरुषार्थ तो कोणता करायचा?

या निर्मळ दृष्टिकोनातूनच आज जो विवाद निर्माण झाला आहे, तो जाणून घेतला पाहिजे. साध्य आहे. परमात्मापद व साधक आहे. जीवाला तो आज संसारी आहे, कर्म-गबध्द आहे, विकारवासनांचे वादळ त्याच्या मनी-मानसी नित्य उठत राहतात त्यातून त्याला मुक्ती हवी. त्या मुक्तीसाठी विविध उपयांनी प्रयत्न करीत असतो. त्या मुक्तीसाठी प्रमुख साधने संयम, व्रते व पूजा-भक्ती इ. आहेत. संयमाशिवाय भेद-विज्ञान होते, हे म्हणणे म्हणजे आत्म-वंचना होय. इंद्रिय निग्रह, मनोनिग्रह यांच्या शिवाय आत्म्यात विशुध्दींचे कल्लोळच निर्माण होत नाहीत. विशुध्दीचा विचार महत्वाचा नसून तशी विशुध्द कृती घडणे अत्यंत महत्वाचे आहे. त्या दृष्टीनें आचार्य अमृतचंद्रानी संयमाचा, व्रतांचा आग्रह धरला आहे. म्हणून क्रम-बध्दतेचा (नियतीचा) आधार घेऊन पुरुषार्थकडे दुर्लक्ष करुन भेदविज्ञांनाची प्राप्ती होणे दुर्लभच होय.

आचार्य आमृतचंद्रांच्या टीकेत सर्वच जैन तत्वज्ञान व त्या तत्वज्ञानाचे मर्म, वा रहस्य स्पष्ट करण्यात आले आहे. जय परमात्मरुपाची भक्तीं, चिंतवन, स्तुती करण्यात ते स्वत: इतके तल्लीन होतात, ते परमात्मपदच केवळ उपादेय आहे, प्राप्त करुन घेण्यासारखे आहे व आजवर त्या परमात्मपदाच्या स्वरुपाचे भान न झाल्यामुळेच हे संसारातील परिभ्रमण चालू आहे. याची सतत जाण त्यांनी विविध रस-गंधाच्या शब्द फुलांनी करुन दिली आहे. त्यांचे अध्यात्म रस-सिक्तपावन शब्द वाचकांच्या ह्रदयातून झंकृत होतात. ते शब्द ही हळूहळू विलीन पावतात व त्या शब्दांचा रस मनीं मनसी घोळत राहातो. ही किमया म्हणजेच त्यांची टीका आत्मख्याति नावाची आहे. त्या आत्म-ख्याति टीकेतून केवळ आत्म्याच्या विशुध्द स्वरुपांचाच रस गळत राहातो. सारे संकल्प-विकल्प हे इंद्रधनुष्याच्या रंगाप्रमाणे हळू हळू महासत्तेत विलीन होऊन जातात. मी ती टीका कितीवेळा वाचली याचे तर आता स्मरण होत नाही. परंतु सहज-शुध्द असा जो आत्म्याचा ज्ञायक-स्वभाव आहे. त्या ज्ञायक स्वरुपांतूनच सहज दर्शन, सहज ज्ञान, सहज चारित्र्य, आनंदरस प्राप्त हेत राहातो. अशा ज्ञायक स्वरुपाच्या आत्म्याची अधिसत्ता, तयाचें साम्राज्य हेच अनंत काळपर्यंत टिकाणारे आहे. सर्व भेदांना उभेदाच्या रंगांत रंगवून टाकणारे त्यांचे कथन आहे.

त्यांच्या कथनातील महत्वाचे सूत्र धरुन त्यांच्या टीकाग्रंथाचा आश्रय करुन मी हे अमृत-कलश भरभरुन वाचकांचे पुढे सादर केलेले आहेत त्या कलशांतील रससिध्दता आचार्यांची आहे. वेगवेगळ्या रीतीनें, जणु अनेकरंगी फुलांचा गुच्छ सजवून मी तो तयार केला आहे. आचार्यांचा विषय विशुध्द आत्मा हाच असल्याने तोच तोच विचार वेंगवेगळ्या पध्दतीने मी मांडला आहे. कदाचित् पुनरुक्तीचा दोष त्यामुळे संभपणे शक्य आहे.

वाचकांनो, दरवर्षी आपणासाठी काही नवीन साहित्य अर्पण करायचा मझा हा नवा संकल्प ही पूर्ण आहे. या रचनेतील दोष दूर करण्यासाठी व सिध्दीसाठी प्रावार्य सुमेरचंद जैन यांच मोलाच सहकार्य झाले आहे. त्यांना धन्यवाद!